# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांनी ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रास भेट देऊन ज्येष्ठांच्या समस्यांचे तातडीने निराकरण करण्याचे दिले निर्देश**
- **"आमचा मुलगा आज आम्हाला भेटला" अश्या शब्दस्वरुपात ज्येष्ठ नागरिकांनी केला मा. आयुक्त यांचा सन्मान**

आज 01 ऑक्टोबर 2024 रोजी ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधत मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांनी भाईंदर पश्चिम, नवघर व भाईंदर पूर्व येथील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रास भेट देऊन ज्येष्ठ नागरिकांशी आपुलकीने संवाद साधला.

महाराष्ट्र शासनाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी लागू झालेल्या "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन" योजनेचा लाभ घेण्यासाठी वैद्यकीय तपासणी करून घेण्याचे आवश्यक असल्याने ज्येष्ठ नागरिकांनी त्यामध्ये अडचण येत असल्याचे मा. आयुक्त यांना सांगितले. त्यावर तात्काळ निर्णय घेत मा. आयुक्त यांनी सदर अडचणींचे निवारण करत वैद्यकीय तपासणी येत्या दोन दिवसात पूर्ण करून घेण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. तसेच भाईंदर पूर्व येथील विरंगुळा केंद्रास भेट देऊन मा. आयुक्त यांनी ज्येष्ठ नागरिक संस्थेची स्मरणिकेचे प्रकाशन केले व ज्येष्ठ नागरिकांना शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ नागरिकांनी दिलेल्या वेळेनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत येत्या ऑक्टोबर महिन्यात विशेष कार्यक्रम करण्यात येणार असल्याचे मा. आयुक्त यांनी नमूद केले. यामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे. "आमचा मुलगा आज आम्हाला भेटला" असे उच्चार ज्येष्ठ नागरिकांनी मा. आयुक्त यांच्या प्रति उच्चारून त्यांचा शब्द स्वरूपात मोठा सन्मान केला. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी व सर्व सोयी सुविधा देण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका सदैव तत्पर राहील असे प्रतिपादन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भाप्रसे) यांनी केले.